तरूण भारत

# अभियांत्रिकी महाविद्यालयात सायबर शक्ती क्लबची स्थापना




**कराड : क्लब स्थापनेचे प्रमाणपत्र देताना प्राचार्य डॉ. संजीव वाघ, भागवत पाटील, प्रा. डॉ. प्रियांका शिंदे व क्लबमधील सदस्य विद्यार्थी.**

प्रतिनिधी
कराड

अभियांत्रिकी महाविद्यालय, कराड व क्विक हिल फाउंडेशन यांच्यात सायबर सुरक्षेसाठी नुकताच सामंजस्य करार संपन्न झाला. या करारातंर्गत 'सायबर शिक्षा फॉर सायबर सुरक्षा' हा उपक्रम सुरू केला आहे. या करारातंर्गत महाविद्यालयात 'सायबर शक्ती' या क्लबची स्थापना करण्यात आली आहे.

सायबर सुरक्षेबाबत समाज व विद्यार्थ्यांच्यामध्ये जनजागृती करणे हा या क्लबचा उद्देश आहे.उपक्रमाची सविस्तर माहिती क्लब समन्वयक प्रा. डॉ. प्रियांका शिंदे यांनी प्राचार्य डॉ. संजीव वाघ यांना दिली. एम. सी.ए विभाग प्रमुख भागवत पाटील उपस्थित होते

उपक्रमासाठी अध्यक्ष म्हणून विद्यार्थी प्रतीक गुंजाळकर, सचिव अनुराग वाझरकर, गतीविधी संचालक प्राजक्ता पवार आणि मीडिया संचालक वैष्णवी निकम यांची निवड करण्यात आली. क्लब स्थापनेच्या संदर्भात मार्गदर्शन करताना प्राचार्य डॉ. संजीव वाघ म्हणाले की, सायबर सुरक्षेबाबतची सजगता ही काळाची गरज आहे. अशा उपक्रमांमुळे विद्यार्थ्यांमध्ये जबाबदारीची भावना वृद्धिंगत होते. सायबर जनजागृती मोहीम, कार्यशाळा आणि प्रशिक्षण कार्यक्रमांचे आयोजन असे उपक्रम भविष्यात राबवले जाणार आहेत.